: प्रकरण पाचवे :

# महात्मा जोतिबा फुले यांचे स्त्रीमुक्ती संदर्भातील विचार

: प्रकरण पाचवे :

# महात्मा जोतिबा फुले यांचे स्त्रीमुक्ती संदर्भातील विचार

महात्मा फुल्यांच्या सामाजिक कार्यात त्यांनी सर्वप्रथम स्त्रीविषयक प्रश्नांना महत्त्व दिल्याचे दिसून येते. स्त्री आणि शूद्र हे हिन्दू समाजातील सर्वाधिक दास्य आणि पिळवणूकीचे धनी असलेले घटक हिन्दू परिवेशातील विषम व्यवस्थेचे ओझे त्यांच्यावर पडे. हिन्दू समाजात प्रचलीत असलेल्या स्त्रीविषयक रूढी आणि परंपरा अत्यंत क्रूर आणि अमानुष स्वरूपाच्या होत्या. स्त्रियांची अवस्था गुलामाहून वाईट होती. सतीसारख्या प्रथा तर पूर्वापार चालत आलेल्या होत्या. [1]

वेदकाळातही स्त्रियांना म्हणावे तसे स्थान नव्हते. आजपर्यंत हिन्दू समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन पूर्णत: एकांगी विषय आणि स्वार्थी असाच राहिला. काळाच्या उत्तरोत्तर स्त्रियांवरील जाचक बंधने वाढतच गेली. आणि समाजातीच स्त्रीचे स्थान कनिष्ठच बनत गेले.[2] मनुस्मृती मध्ये तर स्त्रियांना संरक्षित प्राण्यांचा दर्जा दिल्याचे आढळते. ''बालपणी आई-वडील, तरूणपणी पती, आणि म्हातारपणी मुले स्त्रीचे संरक्षण करतात. ती कधीच स्वातंत्र्यास प्राप्त नसते. या शब्दात मनुस्मृतीत स्त्रीचे वर्णन केले आहे.[3] आजन्म वैधव्य, केशवपन, बालविवाह, पडदा पद्धती, शिक्षणबंदी, स्त्रियांची बालहत्या, बहुपत्नीपद्धती अशा एकापेक्षा एक अमानुष प्रथांची हिन्दू स्त्रीची दशा गुलामाहूनही वाईट बनली होती. एकोणीसाव्या शतकातील हिंदू स्त्रीची दुर्दशा वर्णनापलीकडील होती. [4] थोडक्यात म्हणजे आपल्या अधिकारातील सुखोपभोगाची वस्तू म्हणूनच स्त्रीकडे पाहण्याचा हिन्दू समाजाचा दृष्टीकोन दिसून येतो.

यावरुन असे दिसून येते की, सामाजिक समतेच्या सर्व साधारणांमध्ये स्त्री पुरूष समता फार काय स्त्रियांचे किमान सामाजिक हक्क प्रस्थापित करणे ही सर्वात कठीण गोष्ट आहे. अगदी मानवी

अवस्थेतील -आदिम साम्यवादी समाजातील स्त्री-पुरूष समानता सोडल्यास, पुढे खाजगी मालमत्तेच्या उदयाबरोबरच पुरूषप्रधान कुटुंबव्यवस्था अमलात आली. आणि प्रथम पिता, नंतर पती, अखेर पुत्र यांचे संरक्षण स्वीकारणे हे स्त्रीच्या नशिबी आले. चातुर्वर्ण्य आणि जन्मजात जातिभेद यांच्या उदयानंतरच तर स्त्रीची गुलामगिरी अधिकच पक्की आणि कायमची झाली.[5]

मृतपतीबरोबर सती जाण्याची चाल खिस्तपूर्वकालीन भारतात होती. नवव्या शतकापर्यंत विधवाचे केशवपन करण्याची चाल प्रचारात नव्हती. फक्त जोगणी आणि जोगी हेच काय ते मुंडण करीत असत. मुंढण केल्यामुळे विधवेला वैराग्यशीलतेचे स्वरूप येई. तिने आपले पुढचे आयुष्य ब्रह्मचर्यावस्थेत कंठावे अशी अपेक्षा असे. इ. स. 1000 पर्यंतबालविधवांचे विवाह होत असत. पूर्वीच्या काळी विधवांचे केशवपन करीत नसत. ही चाल बाराव्या शतकापासून प्रचारात येऊ लागली. प्रारंभी केवळ ब्राह्मणच विधवांचे केशवपन करीत, पुढे वरिष्ठवर्गामध्ये ही चाल पसरली.[6]

अशा या स्त्रीदास्याचे मूळ कारण म्हणजे हिन्दू धर्माने केलेले विषमतेचे समर्थन व हिंदू समाजाची एकाधिकारी पुरूषप्रधान पद्धतीच होय. परंतु स्त्री विषयक सुधारणा करण्याचा प्रयत्न मधल्या काळात होत होता.

सतीच्या कायद्याला प्रथम बंदी घातली म्हणून लॉर्ड बेंटिकचे नाव घेतले जात असले तरी त्यापूर्वी 500 वर्षे वेड्या महमद तुघलकाने हिंदू स्त्रियांच्या सक्तीच्या सतीला बंदी घालण्याचा प्रयत्न व सती जाण्यापूर्वी सरकारी परवाना काढण्याची अट घातली होती. पण त्याचा हा प्रयत्न फोल ठरला. अल्लाउद्दीन खिलजीने वेश्यांना बंदी-वेश्यांनी विवाह करावा यासाठी हुकुमही काढले होते.

अकबराने योजलेल्या व प्रयत्न केलेल्या सुधारणा फारच व्यापक व मूलगामी होत्या. भारतीय स्त्रियांच्या हक्कांची पहिली सनद असेच ऐने अकबरीचे वर्णन करावे. अकबरप्रणित स्त्रीविषयक

सुधारणांमध्ये पुढील कलमे आहेत :-

1) हिंदू स्त्रीने सती जाण्यास प्रतिबंध

2) हिंदू स्त्रीच्या पुनर्विवाहास मान्यता.

3) बालविवाहास बंदी-विवाहपूर्वी मुलीचे वय किमान चौदा आणि मुलाचे किमान सोळा असावे. या वयासंबंधी कोतवालाचा शिफारसवजा दाखला मिळविला पाहिजे.

4) विषम विवाहस बंदी - वर आणि वधू यांच्या वयात बारा वर्षापेक्षा अधिक अंतर असू नये.

5) वेश्याव्यवसायावर प्रतिबंध -त्यासंबंधी खास नियम, परवाना पद्धती, वेगळी वस्ती वगैरे. [7]

अकबराचा हा प्रयत्न म्हणजे क्षणमात्र चमकलेला अंधारातील प्रकाश होय. भारताच्या इतिहासात स्त्री-विषयक सुधारणा दृष्टीने अकराबइतके कोणीही प्रयत्न केलेले दिसत नाही. अकबरानंतर स्त्री प्रश्न फारच प्रखर बनत गेला. नंतरच्या 19 व्या शतकामध्येच पुन्हा स्त्री-मुक्तीच्या सुधारणेला सुरूवात झाली.

स्त्री पुरुष समतेचा पुरस्कार त्या काळात इतक्या मूलगामी युक्तीवाद्यांच्या आधारे व सातत्य राखून करणारे जोतीराव स्त्री मुक्तीचे आद्य कैवारीच ठरतात. स्त्रियांसाठी शाळा उघडणे, स्वजनरोष पत्करून स्वत:च्या पत्नीला साक्षर करून त्या शाळेत शिकविणेस सांगणे, विधवांचे केशवपन करणाऱ्या न्हाव्यांचा संप घडवून आणणे, कोणाच्या तरी छद्माला वा सक्तीला बळी पडून मातृत्व लादल्या गेलेल्या निराधार स्त्रियांसाठी प्रसूतीगृह उघडणे अशा प्रकारची भक्कम कामगिरी त्यांनी केली होतीच. तसेच स्त्रीदास्याच्या कारणांचाही खोला जाऊन शोध घेतला होता. त्याकाळात लोकहितवादी भांडारकर, रानडे, आगरकर मलबारी प्रभृतींनी हा स्त्रीप्रश्नांचा विचार केला होता. एकूण हिंदू संस्कृतीचा व विषमताधिष्ठीत

उतरंड वजा समाजरचनेचा एक भाग म्हणूनच त्यांनी स्त्रियांच्या गुलामगिरीचा विचार केलेला दिसून येतो. [8] सामाजिक संरचना क्रांतीकारकरित्या संपूर्णपणे बदलल्याशिवाय स्त्रियांची बंधमुक्तता होण्याची शक्यता त्यांना वाटत नव्हती.

महात्मा फुलेंच्या जीवित कार्याचे 1848-1865 आणि 1865-1890 असे दोन कालखंड पडलेले दिसून येतात. पहिल्या कालखंडामध्येच त्यांनी स्त्रीदास्यविमोचन आणि दलितोद्धार या प्रश्नांकडे लक्ष दिले. तसेच उच्चवर्णियांच्या सुधारणावादी स्त्रियांच्या प्रश्नांनाच अग्रक्रम दिलेला दिसतो. [9] मानवी बंधुता व समता नाकारणाऱ्या हिंदु धर्मावर त्यांनी हल्ला केला. स्त्री आणि पुरूष एकसारख्या एकंदर सर्व मानवी अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र आहेत. हे त्यांचे विचारसत्र होते.[10]

फुल्यांचा स्त्रीदास्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन भिन्न होता. समाजात संकल्पाप्रमाणे सुधारणा घडवून आणायची तर लोकांना आधी शिक्षण दिले पाहिजे. सर्व लोकांना शिकवून शहाणे बनविले पाहिजे. स्त्रिया आणि अस्पृश्यांची गुलामगिरी मुक्त होण्यासाठी ते आवश्यक आहे. म्हणून महार, चांभाराच्या, घेडरामोशांच्या आणि स्त्रियांच्या शिक्षणाची सोय करून देणे हे जोतीरावांनी आपले पहिले कर्तव्य मानले.[11]

घरातील स्त्री शिकली की कुटुंबात शिक्षणाचा प्रसार होईल. ती शहाणी झाली की संबंध कुटुंब शहाणे होईल. मग कुटुंबाकुटुंबामधून ज्ञानाची गंगा वहात जाईल. अशा प्रकारचे विचारप्रवाह त्यांच्यामनात येत होते.[12] आपल्या कार्याची सुरूवात आपल्या घरातूनच करावी म्हणून आपली पत्नी सावित्रीबाई यांस त्यांनी शिकवण्यास सुरूवात केली. जोतीरावांनी मुलींची पहिली शाळा 1848 साली जानेवारी महिन्यात पुण्यात सुरू केली. 1848 हे साल क्रांतिकारक असे साल आहे. स्त्रियांच्या उद्धाराची चळवळ अमेरिकेतही याच वर्षी सुरू झाली. [13] मुलींना, स्त्रियांना शिक्षण दिले तर त्या धार्मिक

फसवणूकीविषयी जागृत होणार, गरिबीला शह देण्यासाठी ताकदवान होणार व अन्याय-अत्याचारांविरोधी आवाज उठविणार असे त्यांना वाटत होते. पण शेवटी जेंव्हा कुटुंबातल्या व सामाजातल्या स्त्रियांच्या गुलामगिरीची तीव्रता त्यांच्या लक्षात आली तेंव्हा स्त्रियांचे गुलामगिरी विरूद्ध बंड, स्त्रियांचा मुक्ती लढा असा आपोआप होणार नाही, त्यासाठी खास कार्यक्रम घ्यावे लागणार हे त्यांच्या लक्षात आले. [14]

'तुम्हाला कुटुंब नष्ट करायचे आहे !' हा स्त्री मुक्तीवाद्यांवरचा आरोप ऐकण्यास मिळतो. 'शिकलेल्या स्त्रिया भांडखोर असतात, दुसऱ्याचे ऐकत नाहीत.' असे देखील काही जुन्या विचारांची मंडळी बोलताना आढळतात. या तऱ्हेच्या मतांबाबतचा जोतीबांचा दृष्टीकोन त्यांनी सत्सार-२ मध्ये मांडलेल्या विचारातून स्पष्ट होतो. अन्यायाविरोधी लढण्यासाठी, फसव्या परंपरा सोडून देण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. 'पितृसत्ताक' कुटुंबपद्धती मोडायला पाहिजे ही त्यांची भूमिका होती. कुटुंबच नष्ट करायचे असा मात्र त्याचा अर्थ नाही. यावरुनच त्यांच्या स्त्री शिक्षणाबाबतची लढाऊ प्रवृत्ती दिसून येते.[15]

स्त्रियांसाठी सहानुभूती म्हणून एक दोन हक्क देणे हे फुल्यांना मान्य नव्हते, तर या उलट स्त्रियांना त्यांचा एक मूलभूत हक्क म्हणून समाजजीवनात पुरूषांच्या बरोबरीने स्थान मिळावयास हवे. असे फुल्यांचे मत होते.[16] विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न हा जरी ब्राह्मण आणि तत्सम उच्च जातींशी निगडीत होता, तरी विधवांची ती दैन्यावस्था, त्यांचे नैतिक अध:पतन फुल्यांना बघवत नव्हते. भ्रूणहत्या नको होती. यातून विधवांची सुटका करणे जरूरीचे होते. विधवापुनर्विवाहाची चाल सुरू करण्यासाठी जोतीराव प्रयत्न करू लागले.

शेणवी जातीतील एका विधवेचा एका शेणवी विधुराबरोबर 8मार्च 1860 रोजी पुण्यात पुनर्विवाह झाला. ती विधवा अठरा वर्षाची होती. ती बातमी प्रसिद्ध करून 'ज्ञानप्रकाशांने' असे म्हटले की,

'आम्ही याच्यावर काही मत देण्याची आवश्यकता नाही. जोतीरावांनी 1864 साली एका शेणवी विधुराचा पुनर्विवाह घडवून आणला असे जे म्हणतात तो पुनर्विवाह वर उल्लेखिलेला पुनर्विवाहच असावा असे दिसते.[17] अशा प्रकारे जोतीरावांनी विधवांनाही स्वत:चे जीवन नव्याने जगण्याचे हक्क आहेत याची जाणीव करून दिली.

मातृवंशपरंपरा संपुष्टात आल्यावर मुख्य प्रश्न निर्माण झाला तो विवाहबाह्य संबंधातून जन्मलेल्या दुर्देवी बालकांचा. यामध्ये खरा गुन्हेगार हा जन्मदाताच असतो. परंतु त्याचे प्रयश्चित्त मुलांना मिळते. पुरूष स्त्रीवर बलात्कार करून किंवा तिच्याशी विवाहबाह्य संबंध प्रस्थापित करून, तिच्या असाह्य स्थितीचा फायदा घेऊन वा तीला मोहात पाडून हा गर्भ तिच्यावर लादतो. मातृत्वापासून मग स्त्री सुटका करून घेण्याचा प्रयत्न करण्यास असमर्थ ठरली तर नाईलाजाने आत्महत्या तरी करते, किंवा त्या निरपराध मुलाला जन्म देऊन उकिरड्यावर फेकते. किंवा जन्मत:च त्या अर्भकास मारले जाते. ही सर्व स्थिति पाहून समाजातील अशा स्त्रियांची या दुष्टचक्रातून सुटका करण्याचे त्यांनी ठरविले आणि त्या दृष्टिने त्यांनी आपली पाऊले उचलली.

इ.स. 1883च्या सुमारास जोतीरावांनी बालहत्या प्रतिबंधक गृह ही संस्था स्थापन केली.[18] जोतीरावांची बालहत्या प्रतिबंधक गृह ही भारतातील अशा स्वरुपाची पहिली संस्था होय जी एका ब्राह्मणेतराने मोठ्या धैर्याने, दयाभूत अंत:करणाने आणि परोपकार बुद्धीने विशेषत: ब्राह्मणविधवांसाठी काढली होती. ब्राह्मण विधवांना दुष्कीर्ति, भ्रूणहत्या, बालहत्या, आत्महत्या व पोलीसकारवाईच्या पाशापासून वाचविण्यासाठी त्यांनी ही संस्था काढली होती. ही संस्था गरोदर स्त्रियांसाठी काढली असली तरी त्याचा एक चांगला परिणाम झाला तो म्हणजे खिस्ती मिशनऱ्यांच्याकडे अशा अनाथ मुलांचे जाणे बंद झाले. कित्येक ब्राह्मण विधवांनी या बालहत्या प्रतिबंधक गृहात सुरक्षित व गुप्तपणे आपली सुटका करून

घेतली. अशा तऱ्हेने त्या नाखुषीने पापाचरणी बनलेल्या पापात्म्यांचे ते उद्धारक ठरले. त्यांनी प्रसिद्ध केलेल्या भित्तीपत्रकाचा आशय असा की, 'विधवांनो, इथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळंत व्हा. तुम्ही आपले मूल न्यावे किंवा इथे ठेवावे हे तुमच्या खुषीवर अवलंबून राहील. त्या मुलांची काळजी हा अनाथाश्रम घेईल.[19] अशा पद्धतीने महान विचाराने प्रेरित होऊन समाजातील अघोरी कृत्याला पायबंद घालण्यात यशस्वी होत गेले.

त्याकाळी वेडगळ आणि निष्ठूर रूढींनी लोकांना ग्रासले होते. देवासाठी नदीत किंवा कड्यावरून जीव देणे, नरबळी देणे ह्या रूढी होत्या. लहान मुलींची हत्या करण्याची मध्ययुगीन रूढी हिंदुसमाजातल्या जाडेजा रजपूत जातीत चालू होती. परंतु पुढे इंग्रज राज्यकर्त्यांना 1879 साली निर्बंध करून त्या चालीचा नायनाट केला. त्याकाळी व्रतस्थ स्त्रिया अहोरात्र जागून तांदळाचे किंवा गव्हाचे दाणे एक लक्ष होईपर्यंत मोजीत बसत. नंतर ते देवाला भक्तीभावाने अर्पण करीत. एकलक्ष निरनिराळ्या वाती देवापुढे लावीत. गाईंना श्रद्धापूर्वक दाणे खायला घालून तिच्या शेणातून बाहेर पडलेले ते दाणे मनोभावाने ते खाणे. आणि शेवटी ब्राह्मणाला दक्षिणा व भोजन देऊन व्रताचा शेवट केला जाई. ह्या सर्व धर्मभोळ्या आणि वेडगळ समजुतीवर हल्ला करण्याची जोतीराव सिद्धता करीत होते.[20]

ब्राह्मण व प्रतिष्ठित समाजातील स्त्रियांच्या या करूणास्पद स्थितीविषयी जोतीबांनी 'दिनबंधू' या वृत्तपत्रातून लेखमाला सुरू केली. याचा परिणाम म्हणून न्हावी लोकांनी एक सभा बोलाविली व त्या सभेत न्हाव्यांनी विधवांचे केस कापू नयेत हा ठराव संमत झाला. या सभेची बातमी इंग्लंडमध्ये समजताच इंग्लंडमधील स्त्रियांनी न्हाव्यांना या कार्याबद्दल अभिनंदनपर पत्र पाठविले.[21] अशा प्रकारच्या स्त्रियांच्या केशवपनाचा विघातक कार्यास बंद करण्यासाठी फुल्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन न्हावी लोकांनीही त्यांच्या कार्यास हातभार लावलेला दिसून येतो.

स्त्रियांनी शिकले पाहिजे. सती प्रथा बंद झाली पाहिजे, हुंडा पद्धती बंद झाली पाहिजे. जातीयता अंधश्रद्धा नष्ट झाली पाहिजे. असे फुल्यांना वाटायचे. [22]

जोतीबांनी इतर कुणा समाजहितदक्ष व्यक्तीने क्वचितच केली असतील अशी काही अभूतपूर्व समाजकार्ये केलेली आहेत. समाजाने पतित म्हणून तिरस्कृत ठरविलेल्या व अनवधनाने वाकडे पाऊल पडलेल्या समाजाच्या दृष्टीने पथभ्रष्ट, स्त्रियांचा वाली होण्याचे असामान्य साहस त्यांच्यासारख्या कुण्या विराळ्याजवळच असावयाचे. इ. स. 1863 मध्ये जोतीबांनी अशा बहिष्कृत महिलांसाठी पुण्यात एका आश्रमाची स्थापना केली. त्यात अशा स्त्रियांना आश्रय तर लाभलाच पण तेथे त्यांना लिहणे वाचणे, उपयुक्त हस्त व्यवसायांचे शिक्षण मिळण्याचीही सोय झाली. अशा प्रकारे थोडे अर्थार्जन करण्याची संधी त्या स्त्रियांना मिळाली. याच आश्रमाचे नाव जोतिबांनी 'बालहत्या -प्रतिबंधक गृह असे ठेवले.[23]

महात्मा फुल्यांचे या कार्याद्वारे स्त्रीमुक्तीचे विचार दिसून येतातच. शिवाय त्यांनी लिहिलेल्या 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकातूनही पहावयास मिळतात. त्यांनी लग्न म्हणजे काय ? याचे उत्तर स्पष्ट करताना म्हटले आहे की हरएक मानव पुरूष व स्त्री हे उभयंता मरेतोपावेतो एकमेकांचे साथी व साह्यकारी होऊन एकचित्ताने वर्तन करून त्यांनी सुखी व्हावे, म्हणून जी काही कबुलायत करण्याची वहिवाट घातली आहे, त्यास लग्न म्हणतात. [24] यावरुन त्यांनी दोघानांही समान लेखल्याचे दिसते.

फुल्यांनी अखंडादि काव्यरचना मध्येही स्त्रीमुक्तीचे विचार तिच्यावर होणाऱ्या अन्यायाच्या रूपाने मांडले आहेत. स्त्रीपुनर्विवाह करण्याची बंदी ।। अन्यायाची धुंदी।। थांग नाही।।1।। (स. वा. 452) स्त्री पुरूष हक्क सर्वां कळवावे।। सत्याने बोधावे ।। मानवांस ।।2।। (स. वा. 471) व्यभीचारासर्वे व्यसनी अम्मल।। भार्येची अक्कल।। गुंग केली।।1।। (स. वा. 475) निर्लज्ज होऊनी फुगड्या खेळतो ।। पकव्यास घालितो ।। स्त्रियासंगे ।।3।।(स. वा. 477) भट पेशवा जो नाना। छेदी

स्रियालेकरांना।।13।। बहु स्त्रीयांचा हा पती।। स्त्रीस का उलटी रीती।।14।। (स. वा. 480), शुद्र मुलीमुला शाळेत घालावें।। सुशील करावे ।। सर्व कामी ।।3।। (स. वा. 486) आर्या अवतार परशुरामाचा।।वैरी विधवांचा ।। बाळे वर्षी।।9।। (स. वा. 490) नाटकांत भट स्त्री वेश होती ।। नाक उडविती।। वेश्येपरी ।।15।। (स. वा. 491), ढोंगासाठी खळ वर्दळीस येती।। यवना निंदीती ।।चुलींपाशी।।37।।(स.वा. 491)[25]

महात्मा फुल्यांनी आपले विचार काव्यात्मक रूपात मांडले आहे. समाजातील सर्व थरातील वर्गातील लोकांचा त्यांनी यामध्ये समावेश केलेला आहे. समाजात विविध वर्गावर अनेक अन्याय होत होते. मात्र स्त्री वर्गावर जास्तच होत होते. विधवेस पुनर्विवाह करण्याचा अधिकार नाही. स्त्री आणि पुरूष हे दोघे समान आहेत. त्यांचे हक्क अधिकार समान आहेत. घरी पत्नी असताना पतीने व्यभिचार करीत, स्त्रीया-मुलांना छळले जाई. अनेक स्त्रियांचा पुरूष पती असतो. मग एकट्या स्त्रीलाच का उलटी रीत लागू आहे ? शूद्रांना मुला-मुलींना शाळेत घालून शिकवून सुशील बनवावे. विधवांचे दु:ख कमी करण्याचा प्रयत्न व्हावा. असा सार असणारे लेख काव्यमयात लिहून त्यांनी समाजाला विचार करण्यास भाग पाडले.

अशा प्रकारे स्त्रियांच्या दु:खाची व्यथा महात्मा फुल्यांनी आपल्या विविध लिखाणातून स्पष्ट केली आहे. 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकात बहुपत्नी विवाहावर त्यांनी टीका केलेली आढळते. ते म्हणतात,काही पुरूष दोन-तीन लग्नाच्या बायका करून त्यास धर्माचा आधार देतात. पण स्त्रियांनी जर दोन-तीन नवरे केले तर पुरूषांना हे चालणार नाही. मग हे पुरूषी आचरण स्त्रियांस कसे आवडेल ? एकंदर सर्व मानवी अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र असता स्त्रियांस एक व पुरूषास एक असे नियम लागू करणे म्हणजे निव्वळ पक्षपात होय.[26]

महात्मा फुले हे स्त्रीमुक्तीचे विचार हे फक्त बोलण्यापुरते मर्यादीत न ठेवता ते कृतीतही

आणत होते. जोतीबांना मूलबाळ नसल्याने त्यांच्या वडिलांनी व वडीलधाऱ्या माणसांनी दुसरे लग्न करून घेण्याचा सल्ला दिला. तेव्हा ते म्हणाले, स्त्रीवर वांझोटेपणा लादणे निर्दयपणा आहे. तिच्या पतीच वांझोटेपणाचे दोष नसतील कशावरून ?[27] अशा प्रकारे प्रतिगाम्यांच्या प्रहारांना त्यांनी मुळीच दाद दिली नसल्याचे दिसून येते.

पुढे जोतिबांनी काशीबाई नावाच्या एका गर्भार ब्राह्मण स्त्रीला आत्मघातापासून परावृत्त केले व या बाईला झालेला मुलगा दत्तक घेऊन त्यांनी त्याचे नाव यशवंत ठेविले.[28] अशा प्रकारे त्यांनी आपले आचरण ठेवल्याचे दिसते. त्यांनी आपले कार्य इतकेच मर्यादित ठेवले नाही तर 1883 दरम्यान फुले मुंबईस गेले असता त्यांना एका देवदासीच्या लग्नाची मिरवणूक जाताना दिसली. अशा अनीतिवर्धक चाल त्या काळात मुंबईत हिंदुमधील मागासलेल्या जातीत फारच बोकाळली होती. जोतीरावांनी या सर्व चालीरीती विषयी विचारपूस केली. मुलीच्या आईस असे न करण्यास समजून सांगण्यासाठी वेळ नव्हता. म्हणून गिरगाव पोलीस सुपरिटेंडच्या घरापुढे गेले. पण सुपरिटेंडची सदर लग्न बंद करण्याची हिम्मत होईना. तेंव्हा जोतीराव स्वस्थ न बसता लगेच मुंबई पोलीस कमिशनर मि. सावटन साहेब यांना भेटून त्यांना समाजातील अनीतिची फैलाव करणाऱ्या या चालीची पूर्ण माहीती दिली. व मुलींना अजाणतेपणाने कुमार्गास लावणाऱ्या आईबापांना सरकारने गुन्हेगार समजून शिक्षा द्यावयास पाहिजे आणि तसेच ही लग्नपद्धती मोडण्याची सरकारने ताबडतोब खटपट करावयास पाहिजे. अशी सावटन साहेबांना विनंती केली. सावटन साहेबांनी जोतीरावांच्या म्हणण्याचा पूर्ण विचार करून सदर लग्न बंद करण्याबद्दल पोलीस अधिकाऱ्यास हुकुम केला. अखेर जोतीरावांच्या खटपटीस यश येऊन पोलीसांनी तो लग्न समारंभ त्या दिवशी होऊ दिला नाही. त्यामुळे मुंबई शहरात फार खळबळ उडाली. पण पुढे काही दिवसांनी हे लग्न घडवून आणून बिचाऱ्या त्या मुलीस अनीतिच्या नरकात लोटले.[29]

अशा पद्धतीने महात्मा फुल्यांची समाजातील दुष्ट चाली बंद करण्यासाठी पाऊल उचलले. 'देवदासी विवाह' पद्धती बंद करण्यासाठीही प्रयत्न केल्याचे दिसते. अशा प्रकारचे कार्य त्या काळात बंद करण्यास फुल्यांनीच पुढाकार घेतल्याचे दिसून आले आहे.

फुले समाजास धर्मापासून भिन्न करून त्यास परिवर्तन करताना धर्मश्रद्धा जशाच्या तशा ठेवण्याचा प्रयत्न करीत नाहीत उलट धर्म आणि समाज यातील अन्योन्य संबंध ओळखून समाज परिवर्तनासाठी धर्मश्रद्धेची मोडतोड आधी करावी लागेल असा सिद्धांत स्थिर करतात.[30] असे दिसून येते.

त्यांनी पितृसत्ताक कुटुंब पद्धतीवरही घणघणाती हल्ला केलेला आहे. आजच्या स्त्री-मुक्तीवादी भाषेत बोलायचे तर 'पितृसत्ताकता' किंवा 'पुरुषप्रधानता' हे एकंदर शोषणाच्या दडपणुकीच्या व लुटीच्या व्यवस्थेचे महत्त्वाचे अंग आहे, असे मांडायला जोतीबांनी सुरूवात केली.

'सत्सार-2' मध्ये किंवा त्यांच्या मृत्युनंतर प्रसिद्ध झालेल्या 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' या पुस्तकात जोतीबांनी स्त्री-पुरूष असमानता व स्त्रियांचे कुटुंबातील दुय्यम स्थान यावर भर दिला आहे. असमानतेच्या विरोधाभासांना त्यांनी आपल्या लिखाणामध्ये उघडे पाडले आहे.[31]

जोतीबांच्या असे लक्षात आले की, पुरुषी दादागिरी फक्त ब्राह्मण समाजातच नसून बहुजन समाजातही आहे. त्यामुळे त्यांनी स्त्रियांच्या शैक्षणिक आग्रहास कमी न करता कुटुंबसंस्थेत सुधारणा घडवुन आणण्याच्या प्रश्नामध्ये जागृतपणे लक्ष घालायला सुरूवात केली. जातीव्यवस्थेचा, पुरूषशाहीचा पराभव करून स्त्रियांची मुक्ती होण्याच्या दृष्टीने कुटुंब पद्धतीची पुनर्रचना हा विचार व कार्यक्रम नंतरच्या काळात त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे अंग म्हणून पुढे आला. त्यांच्या ऐतिहासिक विचारसरणीच्या वैशिष्ट्यांमुळेच धर्म, संस्कृती, रूढी यांचा उच्छेद आणि कुटुंब पद्धतीची पुनर्रचना या गोष्टींवर ते भर देऊ

शकले. [32]

एकंदरीत स्त्री मुक्तीचे विचार लिखित स्वरुपात न ठेवता किंवा माडता त्यांनी स्त्रीदास्यातून स्त्रीला मुक्त करण्याचे कार्य हाती घेतले. त्यांचे कार्य हे 'बोले तैसा चाले' या उक्तीप्रमाणे होते. महात्मा फुल्यांनी पुरूषप्रधानता आणि पितृसत्तकतेवर प्रकश झोत टाकून बहुजन समाज कुटुंबातील स्त्रीयांच्या दडपणूकीवर प्रश्नाचीही मांडणी केलेली आहे.

स्त्रियांच्या प्रश्नाबाबत त्या काळच्या दृष्टीने जोतीबांची भूमिका वैशिष्ट्यपूर्ण होती. त्यांनी स्त्रियांच्या चळवळीला प्रोत्साहन देणारा विचार मांडला. शूद्र, अतिशूद्र किंवा शेतकरी म्हणून नव्हे तर 'स्त्री' म्हणून शोषण कसे होते याची त्यांनी मांडणी केली. कष्टकरी जातीतील कुटुंबामध्ये सुद्धा स्त्रियांची गुलामगिरी किती तीव्र आहे हे फुल्यांनी जोर देऊन आणि अत्यंत परखडपणे मांडले. कुटुंब पद्धतीची पुनर्रचना कार्यक्रम सुचवून या प्रश्नावर खास कृती करण्याची गरज, म्हणूनच जोतीबांनी पुढे आणली. [34]

महात्मा फुल्यांनी आपल्या एकूण आंदोलनात स्त्रियांच्या समानतेच्या लढ्याला शूद्र-अतिशूद्रांच्या बरोबरीने स्थान दिले होते. शिवाय त्यांचे कार्य स्त्री शिक्षणापुरतेच न थांबता प्रौढविवाह, विधवाविवाह, पतिता-परित्यक्ता यांचे बिकट व नाजूक प्रश्न अनाथालये या सर्व क्षेत्रात त्यांनी स्वत: पुढाकार घेऊन प्रत्यक्ष कार्य केलेले दिसून येते.

जोतीबांना जेंव्हा कुटुंबातल्याव समाजातल्या स्त्रियांची गुलामगिरी लक्षात आली तेंव्हा स्त्रियांचे गुलामगिरीविरुद्ध बंड, स्त्रियांचा मुक्ती लढा असा आपोआप होणार नाही, त्यासाठी खास कार्यक्रम घ्यावे लागणार हे त्यांच्या लक्षात आले. शेवटी स्त्रियांची गुलामगिरी सामाजिक कारणामुळे होते. असा निष्कर्ष फुल्यांनी काढला तरी त्यांचा मुख्य भर हा ज्ञान मिळणे न मिळणे यावर होता.

खरेतर जोतीबांनी स्त्री मुक्तीची स्पष्ट भूमिका घेतली होती ती केवळ स्त्रियांचा 'उद्धार' व्हावा किंवा 'स्त्रिया सुशिक्षित झाल्यास कुटुंबाला पुढे जायला बरे होईल' या पातळीवरची नव्हती. एकंदर पुरूषांकडून स्त्रियांवर ही गुलामगिरी लादली आहे आणि ती नष्ट होणे आवश्यक आहे. अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती. [29]

फुल्यांनी त्या काळात त्यांना उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे व लोकपरंपरेतील अंतर्विरोधी व्यवहारांच्या आधारे बहुजन-दलित समाजाच्या स्त्रियांच्या शोषणाचा इतिहास मांडलेला आहे.

**महात्मा फुले काळातील स्त्रीमुक्ती विचाराच्या स्त्रिया :-**

स्त्री ला या समाजाच्या जंजाळातून मुक्त करण्याचे काम जोतीरावांनी केले. त्यासाठी शतकानुशतकांच्या रूढी, परंपरा, भ्रामक कल्पना यांच्याशी लढा देऊन त्या हटवण्याच, वेळ पडल्यास रक्तबंबाळ होऊन आपल म्हणणं मांडत राहण्याच कार्य महात्मा फुल्यांनी केले. या कार्याच फळ म्हणजे समाजात काही स्त्रिया स्वतंत्रपणे विचार करून स्त्री मुक्तीच्या दिशेने पाऊले टाकत होती. विसाव्या शतकातील स्त्री आज स्वतंत्रवृत्तीने वागडत असली तरी त्यामागच कर्तृत्व 19 व्या शतकातील फुलेकाळातील स्त्रीयांचही आहे.

सावित्रीबाई फुल्यांप्रमाणेच त्याकाळात पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, आनंदीबाई जोशी, रमाबाई रानडे, लक्ष्मीबाई टिळक, काशीबाई कानिटकर, रखमाबाई, आनंदीबाई कर्वे, पार्वतीबाई अश अनेक नावांनी 19 व्या शतकात या स्त्रीकर्तृत्वात आपली भर घातली. महात्मा फुल्यांच्या सहाकार्याने सावित्रीबाईनी आपले सामाजिक कार्य चालू ठेवले तर त्यावेळी पंडिता रमाबाईनी आपला वैचारिक विकास घडविला. स्त्रीला अंगणात यायला बंधन असताना ठिकठिकाणी जाऊन व्याख्याने देणारी, संस्कृत

बोलणारी, वेद-उपनिषदांवर चर्चा करणारी, अनाथ-विधवा स्त्रियांसाठी शाळा आणि वसतिगृह सुरू करणारी ही स्त्री म्हणजे 19 व्या शतकाची अमोल देणगीच म्हणावी लागेल. त्यांच्या आचरणातसुद्धा वैचारिक स्त्रीमुक्तता दिसून येते. त्यांनी त्या काळात बिहारीदास मेधावी या शूद्र पण सुशिक्षित गृहस्थाशी लग्न केले. त्यांचा हा धाडसी निर्णय असामान्यच मानायला हवा. एका भाषणात म्हटले आहे, 'वास्तवविक पाहिल तर संसारातील कृत्यांची जास्त जोखीम स्त्रियांवर असल्याने त्यांना पुरूषांपेक्षा जास्त हक्क असावेत, सध्या पुरूष जास्त अरेरावी करीत आहेत व स्त्रियांना निर्जीवाप्रमाणे वागवित आहेत. तेंव्हा त्या स्थितीतून उद्धार करून घेण्यास आपण झटले पाहिजे.' यावरून त्यांना स्त्री दास्याची भयानकता जाणवलेली दिसते. त्यांच्या व्याख्यानांना येताना पुरूषांनी घरातील एकतरी स्त्री आणली पाहिजे, असा नियम केला. त्यामुळे त्या काळात सभेला जाण्या-येण्यापुरते का होइना स्त्रिया बाहेर पडल्याचे दिसू लागल्या. पंडिता रमाबाईंच्या या माहितीवरून त्यांच्यात उपजतच स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता असलेली दिसून येते. या रमाबाईप्रमाणे आणखी एक रमाबाई घडली गेली. ती म्हणजे न्या. रानडेंची पत्नी रमाबाई रानडे. त्यांनी मराठी आणि इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान आत्मसात केले. न्या. रानडेंबरोबर त्या सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये, सभामध्ये वावरू लागल्या. त्यावेळी इतर पुरूषांसमोर स्त्री बोलली तर ते तिच्या नवऱ्यासाठी लांच्छनास्पद मानल जाई. स्त्रिया जर बोलू लागल्या तर त्या पुरुषांना, कुटुंबाला वरचढ होतील ही भीती असे. पतीचा पाठिंबा असल्याने रमाबाईंना सर्व विरोध पत्करून आपले काम सुरू ठेवले. असाच प्रकार महाराष्ट्राच्या पहिल्या लेखिका काशिबाई कानिटकर यांच्या बाबतीत घडला. सासरचा सर्व विरोध सहन करुन गोविंदराव कानिटकरांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी घरीच शिकायला सुरूवात केली. आजूबाजूच्या सामाजिक परिस्थितीचा विचार करून त्या स्वतंत्रपणे लेखन करू लागल्या. कथा कादंबऱ्या, लेख, आत्मचरित्र, चरित्र असे सर्व प्रकारचे लेखन त्यांनी केले. 'पूर्वीच्या स्त्रिया आणि आजकालच्या स्त्रिया' हा त्यांचा लेख खूपच गाजला.

काशिबाई कानिटकरांच्याप्रमाणे महाराष्ट्रातील दुसरी लेखिका लक्ष्मीबाई टिळक. 'स्मृतिचित्रा' मधून आपल्या आयुष्याची कथा त्यांनी वाचकांसमोर मांडली. त्यांच्या लेखन शैली वाचताना आज ही वाचक स्वत:ला हरवून जातो. 'स्मृतीचित्रा' मधून लक्ष्मीबाई घराघरात ओळखल्या जात असल्या तरी पहिली महिला डॉक्टर म्हणून आनंदीबाई जोशींच नाव सगळ्यांना माहीत आहे. त्या काळातील स्त्रिया शक्यतो पतीच्या इच्छेनेच शिकल्या. पंडिता रमाबाईसारखी एखादीच स्त्री त्यास अपवाद असू शकते. वरकरणी पाहता आनंदीबाईंच्या बाबतीत ही हेच झाले. पतीच्या इच्छेपेक्षा त्याच्या लहरीनुसार आनंदीबाईंच आयुष्य गेले. पण त्या शिकाव्यात अस त्यांच्या पतीला वाटत होत एवढच महत्त्वाचा फरक. अमेरिकेसारख्या ठिकाणी कडाक्याच्या थंडीतही आनंदीबाईंनी गरम कपडे वापरण्याऐवजी पाय उघडे टाकणारं नऊवारी लुगडच नेसल पाहिजे. असा अट्टाहास होता. त्यामुळे तेथील थंडी सहन न झाल्याने डॉक्टरकी शिक्षण पूर्ण होत न होत तोच क्षयरोगाने आनंदीबाईंना गाठल आणि त्यातच त्यांची जीवन ज्योत मालवली.

अशाच प्रकारे आनंदीबाई कर्वे यांनी ही आपले आयुष्य या प्रमाणे घालविले. बालविधवा असलेल्या आनंदीबाईंनी घरच्या पाठींबयाने शिकल्या. घरच्यांनी त्यांचा धोंडोपंत कर्व्यांशी पुनर्विवाह लावून दिला. त्यामुळे त्यांना समाजाकडून छळ सोसावा लागला. कर्व्यांनी आपल्या तत्वाचा एक भाग म्हणून त्यांच्याशी विवाह केला. 'माझे पुराण' या आपल्या आत्मचरित्रात लिहितात, कोणीही कुठे शिकण्यात पाठविता का ? असे विचारल्यास कर्वे लगेच तयार होत. त्यामुळे असे वाटे की ह्यांनी माझ्याबरोबर लगन तरी का केले ? या त्यांच्या उद्‌गारावरून त्यांना कुठेतरी एक 'स्त्री' म्हणूनच निराशाच आलेली दिसते. व्यथा भोगावयास लागल्याचे दिसते.

निराशेचे, वैफल्याचे हे हुंकार 19 व्या शतकात वरचेवर ऐकू येत असताना ताराबाई शिंदे

या स्त्रीने पुरूषी वर्चस्वावर घणघणाती हल्ला केली. 1882 मध्ये त्यांनी तत्कालीन समाजावर, पुरूषांवर आसूड ओढणार 'स्त्री पुरूष तुलना' या नावाच पुस्तक लिहील. हे पुस्तक लिहताना त्यामागची भूमिका त्यांनी अशी स्पष्ट केली आहे, ''ज्या परमेश्वराने ही आश्चर्यकारक सृष्टी निर्माण केली त्यानेच स्त्री पुरुषांनाही निर्माण केले आहे. सर्व प्रकारचे साहस, दुर्गुण, अवगुण स्त्रीयांचेच अंगी आहेत तेच पुरूषांच्या अंगी आहेत अगर नाहीत हे दाखविण्याच्या दृष्टीने हा ग्रंथ लिहिला आहे यामध्ये फक्त स्त्री पुरूषांची तुलनाच आहे. त्यांनी अनिष्ट रूढी प्रथांविरुद्ध अतिशय त्वेषाने लिहिले आहे. त्यांच्यासारखी जळजळीत भाषा कोणत्याही स्त्रीने त्याकाळत वापरली नव्हती. त्यांच्या या जडणघडणीच श्रेय त्यांच्या वडिलांना 'बापूजी शिंदे 'यानांच जाते.

त्या काळात एक असामान्य धैर्य लोकांना पहावयास मिळाल ते म्हणजे 'रखमाबाई' तेराव्या वर्षी त्यांच लग्न झालं. चार पाच वर्षांनी सासरी जाण्याची वेळ आली. तेव्हा त्यांनी सासरी जाण्यास नकार दिला. मला समज नसलेल्या वयात माझा विवाह करण्यात आला. तो मला पसंत नाही. नवऱ्याने (दादाजीने) कबूल करूनही पुढे शिक्षण घेतले नाही. तो सतत आजारी असतो. मला त्यांच्याशी संसार करायचा नाही. अशा शब्दात ठणकावून सांगितले. स्त्रीच्या विचारस्वातंत्र्याचा आदर करणारे डॉ. सखाराम अर्जुन सारखे वडील रखमाबाईंना लाभल्यामुळेच त्या हा धाडसी निर्णय घेऊ शकल्या. रखमाबाईंनांच्या निर्णयाने तत्कालीन समाज ढवळून निघाला. दादाजीने रखमाबाईविरूद्ध कोर्टात दावा लावला आणि कोर्टानेही रखमाबाईस 'नवऱ्याकडे नांदायला न जाण्याच्या गुन्ह्याबद्दल' सहा महिन्याची शिक्षा ठोठावली. तरीही रखमाबाईंनी आपला निर्णय बदलला नाही. [36]

अशा प्रकारच्या स्त्रिया 19 व्या शतकात होऊन गेल्या. स्त्री मुक्ती लढ्याची सुरूवात या शतकात झाली याचीच ही बोलकी उदाहरणे होत. काहींच्या विचारांची वाटचाल पूर्ण स्वतंत्र होती. तर

काहींनी आधारासाठी पित्यांचे, पतीचे बोट धरले होते. या मध्ये काहींची गती कमी होती तर काहींची जलद. साध्य मात्र सारखच होत. स्त्रीला माणूस म्हणून जगू द्या माणूस या नात्यानच स्त्रीला समजून घ्या अस त्यांच मागण होत. एकंदरीत स्त्री मुक्त होऊ पहात असली तरी समाजाची बंधने मात्र होतीच. रखमाबाईस शिक्षा झाली तेंव्हा सुधारकांनी काही केलेला प्रयत्न दिसून येत नाही. आनंदीबाई जोशी आणि गोपाळराव जोशी मधल नात हे केवळ मालक आणि त्याच्या मालकीची वस्तू एवढच दिसत. पतीच्या अरेरावी पुरूषी स्वभावामुळेच आनंदीबाईंना शेवटी आपले प्राण गमवावे लागले. अशी स्थिती स्त्रीवर्गाची असली तरी समाज परिवर्तनाचे कार्य करणारे म. फुले यांनी अशा स्त्रियांच अभिनंदनच केल आहे. त्यांच्या विषयी गौरवोद्गार काढले आहेत.

त्यांच्या 'सत्सार-2' या पुस्तकात त्यांनी पंडिता रमाबाई आणि ताराबाई शिंदे यांचे तर त्यांनी अभिमानाने कौतुकास्पद उल्लेख केलेला आहे. यावरुन त्यांनी स्त्रीस्वातंत्र्याच्या, स्त्री मुक्तीच्या, स्त्री कर्तृत्व आणि विकासाच्या नव्या वाटा धुंडाळणाऱ्या स्त्रियांना प्रोत्साहन दिलेले आहे. स्त्रियांना मुक्त करण्याऱ्यांचे महात्मा फुले प्रेरणा शक्ती बनल्याचे दिसते.वरील स्त्रियांच्या कार्यावरुन आपल्याला जमेल तशी, झेपेल तशी त्यांनी महात्मा फुल्यांच्या कार्याला प्रयत्नांना साथ दिली. काहींनी अनामिक राहूनही कार्य केलेले आहे.

म. फुल्यांनी सामाजिक परिवर्तनाचे कार्य करीत असताना व विचार मांडत असताना संपूर्ण समाजाचा विचार केला. त्याचप्रमाणे तत्कालीन स्त्रियांवर धर्माद्वारे, धर्मग्रंथाद्वारे लादलेल्या अनेक दुष्ट प्रवृत्तींचाही धिक्कार केलेला आहे. म. फुल्यांनी केलेले बंड हे कोणत्याही व्यक्ती / व्यक्तीसमूहांविरूद्ध नव्हते तर ते त्या काळात समाजात अस्तित्वात असणाऱ्या व समाजात विषमता निर्माण करणाऱ्या मूल्यांविरूद्ध होते. म. फुल्यांचे स्त्री मुक्तीचे विचार पाहता लक्षात येते की, जोतीबांच्या मृत्युनंतर 100

वर्षांनी सुद्धा आपण अजून स्त्रियांच्या गुलामगिरीचे नेमके स्वरूप उघड करण्याच्या शोधात आहोत. स्त्री मुक्तीची व्यापक मोहीम उभारण्याच्या प्रक्रियेत आहोत. 100 वर्षापूर्वी स्पष्ट स्त्री मुक्तीवादी भूमिका घेणाऱ्या जोतीबांनी या लढ्याची सुरूवात केली होती.

म्हणूनच म. फुले हे ऐकोणिसाव्या शतकातील केवळ महाराष्ट्राचेच नाही तर संपूर्ण भारताच्या क्रांतीचे प्रणेते आहेत. जातिभेद, धर्मभेद यांचा धिक्कार करून मानवी समतेचा पुरस्कार करणारे ते पहिले भारतीय होत. म्हणूनच अधुनिक भारताच्या स्त्री मुक्तीच्या क्रांतीचे धुरीणत्व निःसंदिग्धपणे म. फुल्यांकडेच जाते.

# : ग्रंथसूची :


1) A.S.Altekar – The position of woman in Hindu civilization from pre-Histroic Time to presend Day (1973) P.N.116

2) G.V. Devasthali – Religion and Mythology of Brahmans, Poona University, Poona 1965, P.N. 66

3) Frazer R.W – Indian Thought past and Present, New york, 1915 P.N. 283

4) सौ. निर्मला मगर (भिंगारे) - जोतिराव फुल्यांची समाजपरिवर्तन नीती, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती 1991, पृ. क्र. 43

5) वैद्य प्रभाकर - महात्मा फुले आणि त्यांची परंपरा, लोकवाङमय गृह, मुंबई प्रथमावृत्ती 1974, पृ. क्र. 17

6) धनंजय कीर - महात्मा जोतीराव फुले

7) वैद्य प्रभाकर - उपरोक्त,पृ. क्र. 173-174

8) भा. ल. भोळे - जोतीरावांची समता संकल्पना, लोकवाङमय गृह, मुंबई, प्रथमावृत्ती -1990, पृ. क्र. 22 व 23

9) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - महात्मा फुले प्रेरणा व तत्वज्ञान म. जोतीबा फुले प्रतिष्ठान प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती 1990 पृ. क्र. 21

10) भालचंद्र फडके - फुले-आंबेडकर शोध आणि बोध आनंद प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती 1985, पृ. क्र. 3

11) वसंत देसाई - महात्मा जोतीराव फुले कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे ३०30 पहिली आवृत्ती, 1965 पृ. क्र. 39

12) कित्ता - पृ. क्र. 41

13) बा. ग. पवार - युगपुरूष महात्मा जोतीराव फुले मातृभूमी प्रकाशन पुणे, 1991 पृ. क्र. 29

14) डॉ. गेल ऑम्व्हेट - जोतीबा फुले आणि स्त्रीमुक्तीचा विचार, लोकवाङ्मय गृह, मुंबई प्रथमावृत्ती, 1990, पृ. क्र. 12

15) कित्ता - पृ. क्र. 11, 12

16) सौ. निर्मला मगर - उपरोक्त, पृ. क्र. 44

17) धनंजय किर - उपरोक्त, पृ. क्र. 98

18) बा. ग. पवार - उपरोक्त, पृ. क्र. 60

19) धनंज किर उपरोक्त, पृ. क्र. 98, 99

20) कित्ता - पृ. क्र. 94

21) वीणा कऱ्हाडे - महात्मा जोतीबा फुले लोकवाङ्मय गृह, मुंबई, 3 री आवृत्ती, 1990 पृ. क्र. 18

22) संभाजी खराट - म. फुले आणि सत्यशोधक जलसे साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 1990, पृ. क्र. 3

23) डॉ. गो. मो. रानडे - म. जोतिबा फुले, मंगलप्रकाशन, नागपूर, द्वितीयावृत्ती, 1991 पृ. क्र. 24, 25

24) धनंजय किर - उपरोक्त, पृ. क्र. 422

25) डॉ. स. ग. मालशे धनंजय किर- महात्मा फुले समग्र वाङ्मय महाराष्ट्र राज्य आणि संस्कृति मंडळ, 1969

26) डॉ. स. ग. मालशे, धनंजय किर - उपरोक्त, पृ. क्र. 362

27) धनंजय किर - उपरोक्त, पृ. क्र. 100

28) पंढरीनाथ पाटील - म. फुले यांच्या अप्रकाशित आठवणी रघुवंशी प्रकाशन, पुणे पृ. क्र. 47 ते 49

29) सौ. निर्मला मगर - उपरोक्त पृ. क्र. 81

30) डॉ. गो. मो. रानडे - उपरोक्त पृ. क्र. 25

31) डॉ. गेल ऑम्व्हेट - उपरोक्त, पृ. क्र. 26

32) कित्ता - पृ. क्र. 30 व 31

33) कित्ता - पृ. क्र. 42

34) कित्ता - पृ. क्र. 38

35) कित्ता - पृ. क्र. 29

36) संध्या- नरे पवार - चित्रलेखा साप्ताहिक अग्रलेख - स्त्रियांना मोकळ करणाऱ्या स्त्रिया 10 मार्च 97 पृ. क्र. 15 ते 19

✳✳✳✳